# नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

(महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाच्या अधिपत्यातील महानगर प्रदेश विकास प्राधिकरण)

विभागीय कार्यालय (उत्तर), वैशाली नगर, नागपूर

संकेत स्थळ: http://www.nmrda.org, दूरध्वनी / फॅक्स क्र. ०७१२ २६४०३६६

पत्र क्र.: सहा.अभि.(उत्तर)/नामप्रविप्रा/ 80

नागपूर, दिनांक: / /२०२४ 3/4/2024

प्रति,

सचिव/सरपंच
ग्रामपंचायत फेटरी,
तह. नागपूर(ग्रा.) जि. नागपूर–४४१५०१.

**विषय:–** मौजा–फेटरी, ख.क्र. १२०/२ च्या ले आऊट मध्ये आपल्या सोबत केलेल्या करारनाम्याप्रमाणे हस्तांतरित करण्याकरिता अभिप्राय सादर करणेबाबत.

**संदर्भ:–** सचिव/सरपंच, ग्रामपंचायत फेटरी यांचे दिनांक १४/०२/२०२४ चे पत्र.

उपरोक्त संदर्भाकित पत्राच्या अनुषंगाने मौजा– फेटरी, ख.क्र. १२०/२ अ येथील निवासी अभिन्यास नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर तर्फे दिनांक ०६/०३/२०१७ च्या कारारनामानुसार मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. करारनामातील अटी व शर्ती नुसार अभिन्यासातील मुलभूत सुविधेसाठी विकास कामाच्या नकाशास मंजूरी प्राप्त असुन विकासकाने अभिन्यासातील सिमेंट क्रॉंक्रीटचे रस्ते, पाण्याची पाईपलाईन, मलवाहीकेचे काम, पर्जन्यवाहीका आणि मोकळ्या जागेंची संरक्षण भिंत इत्यादि विकास कामे पूर्ण केले आहे. विकास करारनामाप्रमाणे विकास कामाच्या आधारावर भुखंडके मुक्त करण्यात आले आहे.

विकास करारनामाच्या कलम १७(फ) प्रमाणे विकासकास मोकळ्या जागेचा विकास, सांडपाणी प्रक्रिया संयत्र (Sewerage Treatment Plant) आणि विकसित केलेल्या मुलभूत सुविधा देखभाल व दुरस्तीसाठी ग्रामपंचायत कार्यालयाला हस्तांतरित करणे अनिवार्य आहे.

केलेल्या विकासाची आपल्या स्तरांवर पाहणी/तपासणी करुन ग्रामपंचायतीद्वारे अभिन्यासातील विकास कामे देखभाल व दुरस्तीसाठी हस्तांतरित करुन घेण्याची प्रक्रिया करावी.

सहाय्यक अभियंता (उत्तर)
नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर.

प्रतिलीपी :–

श्री. बाबुलाल रोशनलाल पाटणी आणि ईतर रा. भुखंड क्र. ५२, बलराज मार्ग, धंतोली, नागपूर–४४००१२.

Desktop/ Mamta/NMRDA/NMRDA A-4 Letter